माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००३२५४**

**अपिलार्थी श्री. दिनेशसिंग विठ्ठलसिंग शितल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (ड- कार्यासन )**
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, चौथा मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी**
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, चौथा मजला,
सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०४.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०९.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०७.२०२३ | १०.०८.२०२३/०१.०९.२०२३/ ११.१०.२०२३ | ०७.०९.२०२३ | ११.१०.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २२.१०.२०२३ रोजीच्या अर्जांन्वये योग्य माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १०.०८.२०२३, दि.०१.०९.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ११.१०.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २६.०७.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार खालील माहितीची मागणी केली होती: (१) श्री. एस. एम. वाळकीकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी (चौकशी अधिकारी) यांच्या चौकशी अहवालानुसार संबधित दि. ०६.०६.२०१६ रोजी जबाबदारी निश्चित केल्याप्रमाणे दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही न करुन कर्तव्यात कसूर व दिरंगाई करणारे डॉ. प्रविण शिनगारे, तत्कालिन संचालक, डॉ. बारपांडे, सह-संचालक, (दंत), श्री. जनक जोशी, तत्कालिन प्रशासकीय अधिकारी, श्री. विजय कोळी, कामडी यांची संचालनालय, वैद्यकीय, शिक्षण व संशोधन मुंबई यांची आर्थिक लाभ थांबवणे व शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्याच्या अनुषंगाने संचालनालय स्तरावर योग्य ती चौकशी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तात्काळ प्रस्ताव शासनास सादर केलेली प्रत मिळणे. (२) कर्तव्यात कसूर व

..२/-

दिरंगाई केल्याबद्दल व मा. माहिती आयुक्तांनी २५,०००/- दंड व शास्ती ठोठावल्यामुळे श्री. समाधान जामकर, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांची आर्थिक लाभ थांबवणे व शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्याच्या अनुषंगाने संचालनालय स्तरावर योग्य ती चौकशी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तात्काळ प्रस्ताव शासनास सादर केलेली प्रत मिळणे. (३) कर्तव्यात कसूर व दिरंगाई करणारे श्रीमती एम. क्षीरसागर, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांची आर्थिक लाभ थांबवणे व शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्याच्या अनुषंगाने संचालनालय स्तरावर योग्य ती चौकशी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तात्काळ प्रस्ताव शासनास सादर केलेली प्रत मिळणे.

जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.०८.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, आपण मागणी केलेल्या माहितीचा विषय संबंधीत आस्थापनेशी संबंधीत असल्याने त्यांचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी, आस्था- २ राजपत्रित (ड-१) आस्थापना, वै.शि.व.सं. मुंबई व जन माहिती अधिकारी, क कार्यासन, वै.शि.व.सं. मुंबई या आस्थापनेकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे. तसेच, जन माहिती अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दि. ०१.०९.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, मुद्दा क्र. १ ची माहिती उपलब्ध नाही त्यामुळे ती आपणास उपलब्ध करुन देता येत नाही व मुद्दा क्र. २ व ३ ची माहिती या कार्यासनाशी संबंधीत नाही त्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०७.०९.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.१०.२०२३ रोजी त्यांच्या आदेशात असे नोंदविले की, जन माहिती अधिकारी यांनी सह संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या दि. २०.०१.२०२० रोजीच्या पत्रान्वये श्री. शितल यांच्या प्रकरणी निवृत्तीवेतन व इतर लाभ देण्याबाबत कोणतीही अनियमितता झालेली नसल्याने श्री. वाळवीकर, चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल मा. संचालक यांनी फेटाळला आहे. परिणामी त्याबाबत कोणतीही अनियमितता झालेली नसल्याने पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असे श्री. शितल यांना कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या तिन्ही पत्राच्या प्रती श्री. शितल यांना सात दिवसात उपलब्ध करून देण्यात याव्या असे जन माहिती अधिकारी यांना आदेश देण्यात येत आहे.

मुद्दा क्र. २ नुसार श्री. शितल यांनी श्री. समाधान जागकर, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांच्या प्रकरणात मा. आयुक्त यांनी केलेला दंड व शास्ती २५०००/- रुपये बाबत शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्याच्या अनुषंगाने संचालनालय स्तरावर चौकशी करुन प्रस्ताव शासनास सादर केल्याची प्रत मिळणेबाबत सदरील प्रकरणी संचालनालय स्तरावर चौकशी झाली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले त्यानुसार मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने पुन्हा एकवेळ अभिलेख तपासावा व सद्यस्थितीची माहिती अर्जदारास विनाविलंब देण्यात यावी.

मुद्दा क्र. 3 नुसार श्रीमती. एम. क्षीरसागर, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांच्या विरुद्ध जर कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे योजिले असेल तर तसा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असेल तर त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास ७ दिवसात देण्यात यावी.

..३/-

जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार दि. ११.१०.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने तिन्ही पत्राच्या प्रती या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. मुद्दा क्र. २ नुसार श्री. समाधान जामकर, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांच्या प्रकरणात अभिलेख तपासला असता संचालनालय स्तरावर चौकशी झाली नसल्याचे दिसून येते. मुद्दा क्र. ३ नुसार श्रीमती एम. क्षीरसागर, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांच्याविरुध्द कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला नाही.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे लेखी निवेदन दि. २१.०४.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर अपिलार्थींना दि. ११.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच, श्री. वाळकीकर यांचा चौकशी अहवाल फेटाळण्यात आल्याने पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २२.०४.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**